# विद्युत लोकपाल (मुंबई)

(विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ४२(६) अंतर्गत)

अभिवेदन (Representation) क्रमांक ६८ / २०२६

जास्तीच्या वीज देयकाबाबत व स्मार्ट मीटर ऐवजी पारंपारीक मीटर लावण्याबाबत

ब्रम्हनाथ गुरुपदा कळसगौंड........................................................................................................ अपिलार्थी

विरूध्द

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, (महावितरण) कवठमहाकाळ ..... ..... ..... ..... ..... ..... ..... ..... ..... .... प्रतिवादी

उपस्थिती :-

अपिलार्थीतर्फे :- ब्रम्हनाथ गुरुपदा कळसगौड

प्रतिवादी १ तर्फे :- १) सुरेश मैलापुरे, कार्यकारी अभियंता (अतिरीक्त कारभार) कवठेमहाकाळ
२) सौ. पवार, डेप्युटी मॅनेजर (वित्त), कवठेमहाकाळ विभाग

कोरम :- वन्दना कृष्णा (भा.प्र.से. निवृत्त)

सुनावणी तारीख :- २७ जुलै २०२६

आदेश पारित दिनांक :- ३१ ऑगष्ट २०२६

## आदेश

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २०२० (ग्राहक गाऱ्हाणे व विद्युत लोकपाल विनियम २०२०) मधील विनियम १९.१ अन्वये ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, महावितरण, सांगली परिमंडल, (मंच) यांच्या दिनांक २३ एप्रिल २०२६ च्या आदेशाविरूध्द अपिलार्थीने सदरचे अभिवेदन दिनांक १७ जून २०२६ रोजी दाखल केले. अपिलार्थीने ग्राहक गाऱ्हाणे व विद्युत लोकपाल विनियम २०२० मधील विनियम १९.२२ (एच) नुसार अनामत रक्कम रु.९०००/- चा भरणा दिनांक १ जुलै

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

२०२६ रोजी केला असल्याने सदर अभिवेदनाची नोंदणी दिनांक १ जुलै २०२६ रोजो केली. मंचाने दिनांक २३ एप्रिल २०२६ रोजीच्या आदेशान्वये फेटाळण्यात आली.

**Preamble regarding installation of Smart Meter:**

(A) The Respondent has relied upon the Notification dated 17.08.2021 bearing F. No. 23/35/2019-R&R issued by the Ministry of Power, Government of India, under Clause 4(1) (b) of the CEA (Installation and Operation of Meters) Amendment Regulations, 2019 read with Sections 55(1) and 177(2) (c) of the Electricity Act, 2003, prescribing timelines for mandatory replacement of existing meters with Smart Meters having pre-payment functionality. The relevant extract of the said notification is reproduced below:

*All consumers (other than agricultural consumers) in areas with communication network, shall be supplied electricity with Smart Meters working in prepayment mode, conforming to relevant IS, within the timelines specified below:*

1. *All Union Territories, electrical divisions having more than 50 % consumers in urban areas with AT&C losses more than 15% in financial year 2019-20, other electrical divisions with AT&C losses more than 25% in financial year 2019-20, all Government offices at Block level and above, and all industrial and commercial consumers, shall be metered with smart meters with pre-payment mode by December 2023:*

   *Provided that the respective State Regulatory Commission may, by notification, extend the said period of implementation, giving reasons for doing so, only twice but not more than six months at a time, for a class or classes of consumers or for such areas as may be specified in that notification.*

**(ii) All other areas shall be metered with smart meters with pre-payment mode by March 2025:**

*Provided that in areas which do not have communication network, installation of pre-payment meters, conforming to relevant IS, may be allowed by the respective State Electricity Regulatory Commission.*

*All consumer connections having current-carrying capacity beyond that specified in relevant IS, may be provided with meters with smart meters having AMR facility.*

(B) In accordance with the directives issued by the Government of India under the Revamped Distribution Sector Scheme (RDSS), all existing electricity meters are being upgraded to Smart TOD Meters. The meter replacement work has been entrusted to authorized AMISP (Advanced Metering Infrastructure Service Provider) agencies and is being undertaken

under the supervision of Maharashtra State Electricity Distribution Company Limited (MSEDCL).

(C) Key Benefits of Smart Meters:

- **Free Installation:** Smart meters are installed free of cost to consumers.
- **Time-of-Day (TOD) Tariff:** Consumers can avail tariff benefits during specified time slots in accordance with the applicable Tariff Order issued by the Commission.
- **Real-time Energy Monitoring:** Consumers can monitor electricity consumption, voltage, current, and load in real time through the MAHA VIDYUT mobile application. Daily energy consumption can also be viewed for better energy management.
- **Accurate and Automatic Billing: Meter readings are captured automatically through cellular communication, thereby eliminating manual meter reading errors.**
- **Accuracy of Meters: Smart meters are tested** and certified in Government-approved laboratories to ensure accuracy and reliability.

वरील प्रस्तावनेचा गुगल मराठी भाषांतर खालीलप्रमाणे :

**स्मार्ट मीटर बसविण्याबाबत प्रस्तावना**

**अ)** प्रतिसादकाने भारत सरकारच्या ऊर्जा मंत्रालयाने दिनांक 17.08.2021 रोजी जारी केलेल्या अधिसूचनेचा (F. No. 23/35/2019-R&R) आधार घेतला आहे. ही अधिसूचना केंद्रीय विद्युत प्राधिकरण (मीटरची स्थापना व संचालन) (दुरुस्ती) विनियम, 2019 मधील कलम 4(1)(ब) तसेच विद्युत अधिनियम, 2003 मधील कलम 55(1) व 177(2)(क) अन्वये जारी करण्यात आली असून, विद्यमान वीज मीटर बदलून प्री-पेमेंट सुविधायुक्त स्मार्ट मीटर बसविण्याची कालमर्यादा निर्धारित करण्यात आली आहे. त्यातील संबंधित उतारा पुढीलप्रमाणे आहे :

ज्या सर्व क्षेत्रांमध्ये Communication Network सुविधा उपलब्ध आहे, त्या क्षेत्रांतील सर्व ग्राहकांना (कृषी ग्राहक वगळून) संबंधित भारतीय मानकांनुसार (IS) प्री-पेमेंट पद्धतीने कार्य करणारे स्मार्ट मीटर पुढील कालमर्यादेत उपलब्ध करून देण्यात येतील :

1. सर्व केंद्रशासित प्रदेश, आर्थिक वर्ष 2019-20 मध्ये 50% पेक्षा जास्त शहरी ग्राहक असलेल्या आणि AT&C तोटा 15% पेक्षा अधिक असलेल्या विद्युत विभागांमध्ये, तसेच AT&C तोटा 25% पेक्षा अधिक असलेल्या इतर विद्युत विभागांमध्ये, ब्लॉक स्तर व त्यावरील सर्व शासकीय कार्यालये तसेच सर्व औद्योगिक व व्यावसायिक ग्राहकांना डिसेंबर 2023 पर्यंत प्री-पेमेंट सुविधायुक्त स्मार्ट मीटर बसविणे बंधनकारक राहील.

परंतु, संबंधित राज्य विद्युत नियामक आयोग आवश्यक कारणे नोंदवून अधिसूचनेद्वारे ही मुदत जास्तीत जास्त दोन वेळा, प्रत्येक वेळी सहा महिन्यांपेक्षा अधिक नसलेल्या कालावधीसाठी, विशिष्ट ग्राहकवर्ग किंवा अधिसूचनेत नमूद केलेल्या क्षेत्रांसाठी वाढवू शकतो.

2. इतर सर्व क्षेत्रांमध्ये मार्च 2025 पर्यंत प्री-पेमेंट सुविधायुक्त स्मार्ट मीटर बसविण्यात येतील.

परंतु, ज्या क्षेत्रांमध्ये Communication Network सुविधा उपलब्ध नाही, त्या ठिकाणी संबंधित राज्य विद्युत नियामक आयोग संबंधित भारतीय मानकांनुसार (IS) प्री-पेमेंट मीटर बसविण्यास परवानगी देऊ शकतो.

संबंधित भारतीय मानकांमध्ये निर्धारित क्षमतेपेक्षा अधिक प्रवाह वहन क्षमता असलेल्या सर्व ग्राहक जोडण्यांना AMR (Automatic Meter Reading) सुविधायुक्त स्मार्ट मीटर उपलब्ध करून देता येतील.

ब) भारत सरकारच्या पुनर्रचित वितरण क्षेत्र योजना (Revamped Distribution Sector Scheme – RDSS) अंतर्गत जारी करण्यात आलेल्या निर्देशांनुसार, सर्व विद्यमान वीज मीटरचे स्मार्ट TOD (Time of Day) मीटरमध्ये रूपांतर करण्यात येत आहे. हे मीटर बदलण्याचे काम अधिकृत AMISP (Advanced Metering Infrastructure Service Provider) संस्थांकडे सोपविण्यात आले असून, ते महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित (महावितरण) यांच्या देखरेखीखाली करण्यात येत आहे.

**क) स्मार्ट मीटरचे प्रमुख फायदे :**

- **मोफत स्थापना :** ग्राहकांना स्मार्ट मीटर कोणतेही शुल्क न आकारता मोफत बसविण्यात येतात.
- **टाइम ऑफ डे (TOD) दररचना :** आयोगाने लागू केलेल्या विद्यमान दर आदेशानुसार (Tariff Order) निश्चित वेळांमध्ये वीज वापरल्यास ग्राहकांना दरसवलतीचा लाभ मिळू शकतो.
- **रिअल-टाइम वीज वापराची माहिती :** ग्राहक **'महा विद्युत' (MAHA VIDYUT)** मोबाईलॲपद्वारे वीज वापर, व्होल्टेज, करंट व भार (Load) यांची रिअल-टाइम माहिती पाहू शकतात. तसेच दैनंदिन वीज वापराची माहिती उपलब्ध असल्यामुळे ऊर्जेचे अधिक प्रभावी नियोजन करता येते.
- **अचूक व स्वयंचलित बिलिंग :** सेल्युलर कम्युनिकेशनद्वारे मीटर रीडिंग आपोआप प्राप्त होत असल्यामुळे मानवी हस्ते मीटर रीडिंग घेण्याची आवश्यकता राहत नाही व वाचनातील चुका टळतात.
- **मीटरची अचूकता :** स्मार्ट मीटरची चाचणी शासनमान्य प्रयोगशाळांमध्ये करून त्यांना प्रमाणित करण्यात येते, ज्यामुळे त्यांच्या अचूकतेची व विश्वासार्हतेची खात्री होते.

२. प्रतिवादी महावितरणने त्यांच्या निवेदनातील व दिनांक २७ जुलै २०२६ रोजीच्या सुनावणीदरम्यान सादर केलेले प्रमुख मुद्दे खालील प्रमाणे.

- अपिलार्थी, ब्रम्हनाथ गुरुपदा कळसगौंड, राहणार डोर्ली (ग्राहक क्रं.१७००११९६४१७९) तालूका - जत, सांगली महावितरणचे दिनांक १८ ऑक्टोबर २०१५ पासून घरगुती वीज ग्राहक आहेत. वीज जोडणीचा तपशील खालीलप्रमाणे.

| Name of Consumer | Consumer No. | Address | Date of Supply | Sanctioned Load |
|---|---|---|---|---|
| Bramhnath Gurupad Kalasgaud | 270250010491 | H.No-185 , Dorli Dafalapur, Tal-Jath, Pin-416402 | 19.10.2015 | 0.3 kW |

- अपिलार्थीवर फेब्रुवारी २०२५ महिन्याअखेर रु.१२८०/- ची थकबाकी होती, तिचा अपिलार्थीने दिनांक २० मार्च २०२५ रोजी भरणा केला. अपिलार्थीचा जुना मीटर हा इलेक्ट्रोमॅगनेटीक होता. एप्रिल २०२१ पासून ३७ ते ४० युनीट प्रतिमहीना या कमी वीज वापराप्रमाणे वीज देयके येत होती. म्हणून धोरणात्मक निर्णयानूसार अपिलार्थीचा जुना वीज मीटर (०७५११८३८६४२) हा नवीन स्मार्ट मीटरने (नं एम ४२४१००७१०३२) दिनांक ४ फेब्रुवारी २०२५ रोजी बदलला. नवीन मीटरची नोंद मार्च २०२५ च्या वीज देयकामध्ये झालेली आहे. दिनांक १९ मार्च २०२५ रोजी अपिलार्थीचे मार्च महिन्याचे मीटर वाचन करण्यात आले. अपिलार्थीस माहे मार्च २०२५ ते सप्टेंबर २०२५ अखेर ग्राहकास त्यांच्या प्रत्यक्ष वीज वापरानुसार मीटर रिडींगप्रमाणे वीज देयके देण्यात आली. तथापि, अपिलार्थी सदरहू वीज देयकांचा भरणा करत नव्हते. दिनांक १३ सप्टेंबर २०२५ रोजी ग्राहकाने नवीन बसविलेला स्मार्ट मीटर फास्ट चालत असल्याची तक्रार महावितरणकडे केली. म्हणून दिनांक १७ सप्टेंबर २०२५ रोजी अपिलार्थीचा मीटर टेस्टींग लॅबमध्ये टेस्ट करण्यात आला. मीटरचा टेस्ट रिर्पोटमध्ये मीटर ओके असल्याचे निदर्शनास आले. तसेच मीटर टेस्टींगचा रिपोर्ट अपिलार्थीस देण्यात आला. तरीसुध्दा अपिलार्थीने थकीत वीज देयकाचा भरणा केला नाही. म्हणून अपिलार्थीचा वीज पुरवठा दिनांक २५ ऑक्टोबर २०२५ रोजी तात्पूरता खंडीत करण्यात आला.
- माहे ऑक्टोबर २०२५ ते नोव्हेंबर २०२५ या कालावधीत सदर वीज जोडणी प्रत्यक्ष ठिकाणी तात्पुरती बंद असल्यामुळे स्मार्ट मीटरचे अचूक रिडींग ऑनलाईन प्राप्त झाले नाही. त्यामुळे सिस्टीमद्वारे ॲटो प्रोग्रसिव्ह रिडींगनुसार (१३८२ केडब्लूएच ते १३९३ केडब्लूएच) वीज देयके तयार झालेली आहेत. सबब, सदर कालावधीची अचूक मीटर रिडींगनुसार (१३८२ केडब्लूएच ते १३९३ केडब्लूएच) वीज देयक दुरुस्ती घेणेत ओली. तदनंतर डिसेंबर २०२५ ते जुलै २०२६ अखेर शून्य युनीटची स्थिर आकाराची वीज देयके तयार झाली आहेत.
- महाराष्ट्र वीज नियामक आयोग (वीज पुरवठा संहिता वितरण परवाना धारकाच्या कृतीची मानके आणि पॉवर क्वॉलीटी) विनियम २०२१ (कृतीची मानके आणि पॉवर क्वॉलीटी विनियम २०२१) च्या कलम २.२(एस एस) चा दाखला देण्यात आला तो खालीलप्रमाणे.

*""**स्मार्ट मिटर**" चा अर्थ केंद्रीय विद्युत प्राधिकरण (मीटर बसविणे आणि त्याचे संचालन) विनियम २००६ च्या विनियम २(१)(टिए) मध्ये देण्यात आलेल्या अर्थाप्रमाणे आणि त्यामध्ये वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणानुसार राहील."*

कृतीची मानके आणि पॉवर क्वॉलीटी विनियम २०२१ च्या कलम १५.१.१ चा दाखला देण्यात आला तो खालीलप्रमाणे.

*"१५.१.१सर्व जोडण्या उचित मीटरसह मंजूर करण्यात येतील. सर्व मीटर्स, वेळोवेळी सुधारणा केलेल्या केंद्रीय विद्युत प्राधिकरण (मीटर बसविणे आणि प्रचालन) विनियम २००६ मध्ये निर्गमित केलेल्या विविध विनियमांमध्ये ठरवून देण्यात आलेल्या आवश्यकतांशी सुसंगत असतील. वितरण परवानाधारक नवीन जोडणी भारांकित करण्यासाठी किंवा मीटर बदलण्यासाठी किंवा उर्जेचे लेखापरीक्षण आणि इंटरफेस मीटरसारख्या अन्य प्रयोजनांसाठी देखील वर उल्लेखित विनियमांचे पालन करील.*

*परंतू असे की, सर्व नवीन जोडण्या दूर अंतरावरून मीटरमधील नोंदी घेण्याची किमान सुविधा असणाऱ्या स्मार्ट मीटर किंवा मीटरसह देण्यात येतील.*

*परंतू आणखी असे की, सर्व विद्यमान मीटर्स जेव्हा बदलण्यात येतील तेव्हा दूर अंतरावरून मीटरमधील नोंदी घेण्याची किमान सुविधा असणाऱ्या स्मार्ट मीटर किंवा मीटरनेच केवळ बदलण्यात येतील."*

- केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या संयुक्त विद्यमाने सुधारीत वितरण क्षेत्र (Revamped Distribution Sector Scheme-RDSS) हि सुधारणा - अधिष्ठित आणि निष्पत्ती - आधारीत योजना सपुर्ण महाराष्ट्रामध्ये महावितरणतर्फे राबविण्यास शासन मान्यता मिळालेली आहे. तसेच शासनाच्या निर्देशानुसार व उर्जा मंत्रालयाच्या धोरणानुसार वीज वितरण क्षेत्रात पारदर्शकता, अचूकता व कार्यक्षमता वाढविण्याच्या हेतूने स्मार्ट मीटर बसविण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.
- वरील निर्णयानुसार ग्राहकाचे जुने मीटर बदलून नवीन स्मार्ट मीटर बसविण्यात आला आहे. तसेच अपिलार्थीच्या विनंतीनुसार स्मार्ट मीटर तपासला असता तो योग्य असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे अपिलार्थीस माहे ऑक्टोबर २०२५ ते नोव्हेंबर २०२५ या कालावधीची चुकीच्या मीटर रिडिंगची वीज देयके दुरूस्ती करून देण्यात आलेली होती व अपिलार्थीचे वीज देयक रू.१५६९/- ने कमी करून देण्यात आले. **अपिलार्थीचे जुलै २०२६ अखेर रू.१९२६६/- ची वीज देयक थकबाकी आहे व त्याचा भरणा अपिलार्थीने करने आवश्यक आहे.**

अपिलार्थीच्या मीटर रिडींगचा विस्तृत तपशिल खालीलप्रमाणे.

| Month | Meter No. | Meter Status | Previous Reading (kWH) | Current Reading (kWH) | Cons. (Units) |
|---|---|---|---|---|---|
| Jan-25 | 7511838642 | Faulty | 1096 | 1096 | 37 |
| Feb-25 | | Faulty | 1096 | 1096 | 37 |
| Mar-25 | M42410071032 | Normal | 0 | 375 | 412 |
| Apr-25 | | Normal | 375 | 656 | 281 |
| May-25 | | Normal | 656 | 908 | 252 |
| Jun-25 | | Normal | 908 | 1041 | 133 |
| Jul-25 | | Normal | 1041 | 1143 | 102 |
| Aug-25 | | Normal | 1143 | 1229 | 86 |
| Sep-25 | | Normal | 1229 | 1382 | 153 |
| Oct-25 | | Normal | 1382 | 1506 | 124 |
| Nov-25 | | Normal | 1506 | 1606 | 100 |
| Dec-25 | | Normal | 1606 | 1606 | 0 |
| Note: | 1.Old Meter (No.07511838642 ) was replaced by new Smart Meter (No. M42410071032) on 04.02.2025. | | | | |
| | 2. The meter was temporary disconnected on 25.10.2025. | | | | |

दिनांक १० डिसेंबर २०२५ रोजी अपिलार्थीच्या मीटरची तपासणी केली असता मीटर सुस्थितीत असून त्यावर १३९३ केडब्लुएच चे मीटरचे रिडींग होते. तसेच दिनांक २० मार्च २०२६ रोजी अपिलार्थीच्या प्रिमायसेसची तपासणी केली असता अपिलार्थीचा लोड खालीलप्रमाणे असल्याचे निदर्शनास आले.

| Sr. No. | Particulars | No. | Capacity (Watt) | Total load |
|---|---|---|---|---|
| 1 | CFL | 5 | 9 | 45 |
| 2 | Fan | 2 | 60 | 120 |
| 3 | T.V. | 1 | 100 | 100 |
| 4 | Mixer | 1 | 50 | 50 |
| 5 | Heater | 1 | 2000 | 2000 |
| 6 | Water Purifier | 1 | 60 | 60 |
| 7 | Motor Pump | 1 | 746 | 746 |
| **Total Load** | | | | **3121** |

- प्रतिवादीने भारत सरकारच्या उर्जा मंत्रालयाच्या दिनांक १७ ऑगष्ट २०२१ च्या अधिसुचना तसेच Revamped Distribution Sector Scheme (RDSS) अंतर्गत जारी निर्देशांचा आधार घेत राज्यातील विद्यमान व नवीन वीज ग्राहकांसाठी स्मार्ट मीटर बसविण्याची प्रक्रिया राबविण्यात येत असल्याचे नमुद केले आहे. स्मार्ट मीटर बसविणे ही शासनाच्या धोरणानुसार व नियामक तरतुदींनुसार करण्यात येणारी कार्यवाही असल्याचे प्रतिवादीने स्पष्ट केले आहे.
- प्रतिवादीने विनंती केली की, अपिलार्थीचे अभिवेदन फेटाळण्यात यावे.

३. अपिलार्थीने त्यांच्या निवेदनातील निवेदनातील व दिनांक २७ जुलै २०२६ रोजीच्या सुनावणीदरम्यान सादर केलेले प्रमुख मुद्दे खालील प्रमाणे.

- अपिलार्थी, ब्रम्हनाथ गुरुपदा कळसगौंड, राहणार डोर्ली (ग्राहक क्रं.१७००११९६४१७९) तालूका - जत, सांगली महावितरणचे दिनांक १८ ऑक्टोबर २०१५ पासून घरगुती वीज ग्राहक आहेत. अपिलार्थी हे अल्पभुधारक आहेत. अपिलार्थीची आर्थिक परिस्थिती बेताची आहे.
- अपिलार्थीने डिसेंबर, जानेवारी व फेब्रुवारी २०२५ चे थकीत वीज देयक रु.१२८०/- चा भरणा दिनांक २० मार्च २०२५ रोजी केला. तदनंतर दिनांक २६ मार्च २०२५ रोजी महावितरणच्या एजन्सीने स्मार्ट मीटर बसविला. *(नोटः प्रतिवादी यांच्या निवेदनानुसार अपिलार्थीचा जुना वीज मीटर (०७५११८३८६४२) हा नवीन स्मार्ट मीटरने नं (एम ४२४१००७१०३२) दिनांक ४ फेब्रुवारी २०२५ रोजी बदलला. नवीन मीटरची नोंद मार्च २०२५ च्या वीज देयकामध्ये झालेली आहे. दिनांक ११ मार्च २०२५ रोजी अपिलार्थीचे मार्च महिन्याचे मीटर वाचन (०००३७५ केडब्लुएच) करण्यात आले.)* त्यामुळे अपिलार्थीना रु.६०१९/- चे वीज देयक आले. स्मार्ट मीटर जोरात चालत असल्यामुळे अपिलार्थीने दिनांक १३ सप्टेंबर २०२५ रोजी महावितरणकडे मीटर जोरात चालत असल्याची लेखी तक्रार केली. अपिलार्थीचा मीटर दिनांक १७ सप्टेंबर २०२५ रोजी टेस्टींगसाठी नेण्यात आला होता तेव्हा अपिलार्थीस कळविण्यात आले नाही. त्यामुळे मीटर तपासणीच्यावेळी अपिलार्थी तेथे उपस्थित नव्हते. अपिलार्थीच्या घरी परत तोच मीटर बसविण्यात आला. तदनंतर अपिलार्थीचे वीज देयक वाढतच गेले ते सप्टेंबर २०२५ अखेर रु.१६६६९/- इतक्या रक्कमेचे झाले. अपिलार्थीचा मीटर दिनांक २५ ऑक्टोबर २०२५ रोजी तात्पूरता खंडीत करण्यात आला. अपिलार्थी तेव्हापासून अंधारात आहेत. अंधारामुळे जगणे मुश्किल झाले आहे.
- अपिलार्थीने विनंती कली की, अपिलार्थीचे वीज देयक कमी करून देण्यात यावे, बसविलेला स्मार्ट मीटर च्या जागी जूना पारंपारीक मीटर लावण्यात यावा ही विनंती.

**विश्लेषण व निर्णय**

४. दोन्ही पक्षकारांचे म्हणणे ऐकण्यात आले व उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन करण्यात आले.

५. अपिलार्थीने नमुद केले की त्यांना लावलेला स्मार्ट मीटर वस्तूता दिनांक २६ मार्च २०२५ रोजी लावला असून खुप वेगाने चालतो. अपिलार्थीकडे तसा घरात जास्तीचा वीज वापर नाही, घरात फक्त दोन बल्ब व एक पंखा चालू असताना ऐवढे जास्तीचे वीज देयक येणे शक्य नाही. अपिलार्थी वीजे अभावी अंधारात राहत आहेत. म्हणून अपिलार्थीने विनंती केली आहे की त्यांचे वीज देयक कमी करून देण्यात यावे.

६. प्रतिवादीने नमुद केले की, फेब्रुवारी २०२५ महिन्याची रू.१२८०/- ची थकबाकीचा दिनांक २० मार्च २०२५ रोजी भरणा केला. अपिलार्थीचा जुना मीटर हा इलेक्ट्रोमॅगनेटीक होता, म्हणून नवीन धोरणात्मक निर्णयानूसार दिनांक ४ फेब्रुवारी २०२५ रोजी स्मार्ट मीटरने बदलला. अपिलार्थीस त्यांच्या प्रत्यक्ष वीज वापरानुसार अचूक मीटर रिडींगप्रमाणे वीज देयके देण्यात आली. तथापि, अपिलार्थी सदरहू वीज देयकांचा भरणा करत नव्हते. दिनांक १३ सप्टेंबर २०२५ रोजी ग्राहकाने नवीन बसविलेला स्मार्ट मीटर फास्ट चालत असल्याची तक्रार महावितरणकडे केली. म्हणून दिनांक १७ सप्टेंबर २०२५ रोजी अपिलार्थीचा मीटर टेस्टींग लॅबमध्ये टेस्ट केला असता मीटर योग्य प्रमाणात चालत असल्याचे निदर्शनास आले. अपिलार्थीने थकीत वीज देयकाचा भरणा केला नाही, म्हणून अपिलार्थीचा वीज पुरवठा दिनांक २५ ऑक्टोबर २०२५ रोजी तात्पूरता खंडीत करण्यात आला. वीज नियामक आयोग व राज्य शासन व केंद्र शासन धोरणानुसार स्मार्ट मीटर बसविणे बंधनकारक आहे. अपिलार्थीच्या विनंतीनुसार मीटरची तपासणी केली असून मीटर योग्य व अचूक असल्याचे आढळले. त्यामुळे त्यांना देण्यात आलेली सुधारीत वीज देयक योग्य असून त्यांचा भरणा करणे अपिलार्थीवर बंधनकारक आहे. (अपिलार्थीची थकबाकी जुलै २०२६ अखेर रू.१९२६६/- ची आहे).

७. अपिलार्थीचे स्मार्ट मीटरची टेस्टींगमध्ये दिनांक १७ सप्टेंबर २०२५ रोजी टेस्ट केला असता, सदर मीटर योग्य प्रकारे चालत असल्याचे टेस्टींग रिपोर्ट मध्ये आढळून आले. अपिलार्थीस मीटर वाचनाप्रमाणे वीज देयके देण्यात आली. ग्राहकाच्या सिपीएल नुसार सदयस्थितीत अपिलार्थीची रू.१९२६६/- ची थकबाकी असल्याचे निदर्शनास येत आहे. वरील सर्व बाबींचा उहापोह करता अपिलार्थीचे वीज देयक योग्य आहे. अपिलार्थीची विनंती असेल तर तपासणी शुल्काचा भरणा करून त्यांच्या मीटरची पुन्हा मीटर टेस्टींग करण्यात यावे. सपुर्ण परिस्थितीचा आढावा घेऊन खालीलप्रमाणे निर्देशीत करण्यात येत आहे.

- प्रतिवादीने देयकावर लावलेले व्याज व विलंब शुल्क आकारणी मार्च २०२५ पासून आदेशाच्या तारखपर्यंत रद्द करण्यात यावी.
- अपिलार्थीने वीज देयकाच्या थकबाकीचा भरणा करण्यासाठी समान १० (दहा) हफ्ते देण्यात यावे.

८.	अपिलार्थीने अभिवेदन सादर करते वेळी भरणा केलेली अनामत रक्कम रु.१०००/-, अपिलार्थीच्या वीज देयकात समायोजित करण्यात यावी.

९.	अपिलार्थीचे अभिवेदन फेटालण्यात येऊन निकाली काढण्यात येत आहे.

सही/-
(वंदना कृष्णा)
विद्युत लोकपाल (मुंबई)